|| श्री ||

# फैसला

कागदाच्या पुडीचा आलेला पेपर घेऊन तो वाचत मीरा गॅलरीत कठड्यापाशी उभी होती. शामने बरेचदा ते पाहिलं होतं. चाकरमान्या शामला खांद्यावर सॅक लटकवून ऑफिस मध्ये जाताना-येताना मीरा रोजच पहात होती. चाळीत ती त्याच्या मजल्यावरच दोन खोल्या सोडून रहात होती. गोरी, दिसायला नीटस, देखणी. तिच्या काकांकडे रहात होती ती. काकी दमेकरी. सतत आजारी. काकाच्या दोघा मुलांना सांभाळण्यासाठी म्हणून काकाने गावावरून हिला बोलावून घेतलं होतं. गावात दहावी पर्यंत शाळा शिकली होती ती. मुंबईला नेऊन तिला कॉलेजला घालेन. पोरगी शिकेल. काकाने हिच्या बापूला कॉलेज शिक्षणाचं मोठ्ठं आमिष दाखवलं आणि बापू पोरीच्या भविष्याची स्वप्नं पहाण्यात रमला. गावच्या पाटलाच्या पोराच्या नजरेपासून पोर दूर गेल्याचा बापूला आनंद होता. तिच्या कॉलेजसाठी म्हणून बापूकडून तिच्या लग्नासाठी जमवलेले पैसे पण काकाने मागून घेतले होते.

प्रत्यक्ष मुंबईत आल्यावर मात्र काकाचा टुकीचा संसार रेटण्यातच तिचे दिवस जात होते. कॉलेज शिक्षणाचा पत्ताच नव्हता. काकाच्या पोरांचे शाळेचे डबे बनवायचे, म्युनिसिपालटीच्या नळावरून प्यायचं पाणी भरायचं. घरातल्या नळाला पाणी येईल तेव्हा सगळ्यांचे कपडे धुवायचे, भांडी घासायची. जेवण बनवायचं आणि दमेकरी काकीचं पथ्यपाणी करायचं.

शामकडे येणारा रोजचा पेपर तिला वाचायला देण्याच्या निमित्तानं तिचं त्याच्याशी बोलणं होऊ लागलं. काकाच्या घरातली कामं करताना मेटाकुटीला आलेला तिचा जीव आता दिवसभरात वेळ मिळेल तेव्हा पेपर वाचण्यात रमू लागला. तिची वाचनाची आवड पाहून त्याने लायब्ररी लावली आणि चांगली चांगली पुस्तकं तो तिला आणून देऊ लागला.

पुस्तक देण्या-घेण्याच्या निमित्तानं शामशी तिचं बोलणं होई. त्यावेळी आजारी काकीची नजर आपल्यावर असते हे मीराला माहीत होतं. आजकाल तर कॉटवरून उठवत नाही तरी आपण पाणी भरायला खाली जातो तेव्हा काकी चाळीच्या गॅलरीत येऊन उभी राहिलेली असते हे तिनं पाहिलं होतं. काकी म्हणायची, “दुसऱ्याची तरणी ताठ पोर म्हणजे आमच्या जीवाला घोर !”

मीराला वाटे, एकदा काकीला म्हणावं, “मी आपणहून नव्हते आले तुमच्या घरी. तुम्हीच आणलंत इकडे, तुमची घरकामाची नड म्हणून.”

पण हे बोलणं फक्त मनांतच असे. कुणाला दुखवण्याचा तिचा स्वभावच नव्हता. आणि आता तर काय, गावाला परतायचे दोरही कापले गेले होते .मागच्या वर्षी वारंवार झालेल्या भूकंपामध्ये आधीच मोडकळीस आलेलं गावचं घर जमीनदोस्त झालं .बापू आणि माई त्या कोसळलेल्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले .त्यावेळी काकाबरोबर गावाला जाऊन तिने एकदाच काय ते रडून घेतलं, डोळे सुजवून घेतले आणि उपाशी पण राहून घेतलं.

मुंबईला परत आल्यावर ह्या कशाला उसंतच नव्हती तिला. काकी तशी बरी होती स्वभावाने. पण स्वत:च्या सततच्या आजाराने ती कावली होती. ही उफाड्याची पुतणी घरी आहे म्हणून तिला काळजी वाटे.

काका एका फिल्म प्रोड्युसरकडे स्पॉट बॉय म्हणून काम करत होता .आपल्या तुटपुंज्या पगारात खाणाऱ्या पाच तोंडांची भूक भागवायची, पोरांच्या शाळेचा आणि बायकोच्या दवा-पाण्याचा खर्च करायचा. तोही वैतागून जायचा. मग हिच्या बापूने हिच्या लग्नासाठी जमवलेले पैसे, गावचं घर भूकंपात पडलं आणि त्यात झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून सरकारकडून मिळालेली रक्कम, अशा सगळ्या जास्तीच्या पैशाची ठिगळं लावत तो आपला संसाराचा गाडा रेटत होता. मीराच्या लग्नाचा विचार करायला काका-काकीला वेळच नव्हता.

एकदा संध्याकाळी मीराला जिन्यात गाठून शामने विचारलं, “मी कसा वाटतो तुला? लग्न करशील माझ्याशी? तुला पसंत असेल तर मी येऊन काका-काकीला विचारतो तुझ्या.”

तिच्या कडेवरच्या पाण्याने भरलेल्या हंड्यातलं पाणी थोडं हिंदकळलं. त्या पाण्याने अंगावरचा ड्रेस थोडा ओला झाला. त्याला काहीच उत्तर न देता ती जिन्यातून पटकन वर  सटकली. पुढचे काही दिवस ती शाम दिसला की लाजत होती, त्याला चुकवत होती. त्याला काही तिच्या मनाचा  थांग लागला नाही. आणि त्यानेही कधी मर्यादा ओलांडली नाही.

गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी रोजचा पेपर तिला वाचायला द्यायला म्हणून शाम आला. गुपचुपपणे कुणाच्याही नकळत त्याने मीराला कानातले डूल दिले. खोटेच. पण सुंदर चमचमणारा लोलक असलेले .“संध्याकाळी  कोपऱ्यावरच्या गणपतीच्या मंदिरात वाट पहातो .

आवडले असले तर घालून ये." शाम म्हणाला .ती हरखली .संध्याकाळी भाजी आणायला बाहेर पडू तेव्हा मंदिरात जायचंच, तिने मनाशी ठरवलं.

काकाच्या प्रोड्युसरचा नवीन सिनेमा येणार होता. त्याचा मूहुर्ताचा शॉट गुढीपाडव्याच्या मूहुर्तावर कोपऱ्यावरच्या गणपतीच्या मंदीरात होता .शूटिंग बघायला काकाने आपल्या दोन्ही मुलांना आणि मीरालाही सोबत न्यायचं ठरवलं .त्याने प्रोड्युसरची खास परवानगी घेतली . काकीच्या नव्या कॉटन साडीची घडी मोडायला काकीने तिला दिली .अबोली रंगाची ती वायल आणि त्यावर शामने दिलेले लोंबते डूल घालून ती तयार झाली .चुलत भावंडांबरोबर मंदिरात पोचली .शूटिंग असल्यामुळे ह्या तिघांना दुसऱ्या बाजूने मंदिरात प्रवेश दिला .बाकीची बघ्यांची गर्दी भजनाला जमलेला मॉब म्हणून होता.

शूटिंगच्या गर्दीत, त्या अनोळखी लोकात तिची भिरभिरती नजर शामला शोधत होती. कानातले चमचमते डूल ती मध्ये मध्ये सारखी चाचपडत होती. एकीकडे खांद्यावरचा घसरू पहाणारा पदर आणि पायात येणारी साडी सावरत होती.

प्रोड्युसरचं तिच्याकडे लक्ष गेलं. त्याने तिला पुढे बोलावलं. काका लगबगीने पुढे झाला. पुतणीची प्रोड्युसरशी त्याने ओळख करून दिली .देवळातल्या भजनाच्या मॉब मध्ये तिला प्रोड्युसरने हिरॉईनच्या बाजूला बसायला सांगितलं .शूटिंगच्या वेळी तिच्या सात्विक चेहर्यावर खूप वेळा कॅमेरा फिरला .काकाही खूष झाला .शूटिंग संपल्यावर प्रोड्युसरने सर्वांसमक्ष तिच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली.

"बेबी, तूने बहुत अच्छा शॉट दिया" म्हणत तिचे गालगुच्चे घेतले, कवटाळलं. त्याचा लागट, किळसवाणा स्पर्श, छातीपाशी रेंगाळलेला हात... लांडग्याची नजर... ती आक्रसली. त्या गर्दीत शाम कुठून तरी आपल्याला पहात तर नसेल ना ह्या विचाराने मनातून घाबरली देखील.

शूटिंग संपून घरी यायच्या वेळी प्रोड्युसरने काकाच्या हातात पैशाचं पाकिट सारलं. प्रोड्युसर काकाला सांगत होता, "कल गोरेगावमें शूटिंग है अपना । वहाँ भी बेबी को लेके आना । फिल्ममें साईड रोल करके लोगोंके नजरोंमें आ जायेगी, फिर उसे अगली फिल्ममें अच्छासा बडा रोल दे देंगे । तब तक बेबी काम भी सीख जाएगी । एक-दो फिल्म के बाद उसेही हिरॉईन बनायेंगे । आपभी मालामाल हो जायेंगे । आखिर कबतक पुरानी बस्तीमें रहोगे? अब बडे

फ्लॅटका सपना देखो । आपके बच्चोंकी पढाईका सपना पूरा हो जाएगा । आपके पास हिरा है हिरा । उसे घर में छुपाकर नहीं रखना चाहिये ।"

काका प्रोड्युसरसमोर नुसताच मान डोलवत होता.

चाळीपाशी आल्यावर काका मिठाई घेऊन येतो म्हणाला. भावंडं आपल्या आईला ही आनंदाची बातमी सांगायला धाडधाड जिने चढून धावली.

तेवढ्यात चाळीच्या कंपाऊंडच्या गेटपाशी तिला शाम दिसला. त्याचा चेहेरा पडला होता. धावत त्याच्याजवळ जात त्याचा हात पकडून मीरा म्हणाली, "शाम, प्लीज मला इथून कुठेही दुसरीकडे घेऊन चल. मला सिनेमात काम करायचं नाहीये. मला त्या प्रोड्युसर बरोबर काम करायचं नाहीये." प्रोड्युसरचं बोलणं, त्याची नजर आठवून आताही ती भीतीने शहारली होती.

शूटिंगच्या गर्दीत शाम होता. त्याने झाला प्रकार डोळ्यांनी पाहिला होता. तिला गेटपासून थोडं बाजूला, दुसऱ्या दिशेने नेत तो म्हणाला, "आपण पोलिस चौकीत जाऊ. तिथे तू हे सर्व सांग. मी तुला असं कुठेतरी नेऊन, लपवून ठेऊ शकत नाही."

त्याची असहायता तिने जाणली. दोघं पोलिसचौकीत निघाले. वाटेत तिने शामला तिच्या मनातली शंका बोलून दाखवली. आता तिला काकाचीही भीती वाटत होती. पैसा माणसाची सद्सद् विवेक बुध्दी, नाती विसरायला लावतो हे ती समजून चुकली होती.

पोलिस चौकीतल्या इन्सपेक्टरने सर्व ऐकून घेतलं. इन्सपेक्टर म्हणाले, "पुराव्याशिवाय आपण अशी त्या प्रोड्युसरबद्दल तक्रार नोंदवू शकत नाही. आपण असं करू, माझी बायको सोशल वर्कर आहे. तुम्ही माझ्या घरी चला. आपण माझ्या बायकोशी बोलून तिचा सल्ला घेऊ. ती सांगेल त्याप्रमाणे हिची राहण्याची सोय कशी, कुठे करता येईल ते पाहू."

दोघांनाही ते पटलं. इन्सपेक्टरच्या जीपमध्ये मीरा बसली. शाम पुढे ड्रायव्हरच्या शेजारी होता. तिच्या मांडीवर हात  ठेवून इन्सपेक्टर तिला काही सांगू लागले. त्यांच्या हाताचा तिच्या मांडीवरचा दाब - तो स्पर्श....शूटिंगच्या वेळच्या प्रोड्युसरच्या स्पर्शासारखाच....

पुढच्या धोक्याची तिला चाहूल लागली. आगीतून उठून फुफाट्यात सापडल्याचं समजून चुकलं. आपल्या आयुष्याची परवड तिला होऊ द्यायची नव्हती. तिने जीप थांबवायला सांगितली. मात्र ड्रायव्हरने जीप तशीच पुढे नेली. काही कळायच्या आत तिने इन्सपेक्टरच्या

पॅन्टच्या खिशापाशी असलेलं पिस्तूल हातात घेऊन इन्सपेक्टरच्या डोक्यात गोळ्या झाडल्या होत्या....

“मीरा, काय केलसं तू हे ?” शाम तिला विचारत होता. दोन महिला पोलिसांनी तिच्या हातात बेड्या अडकवून तिला धरून ठेवलं होतं.

मीरा शांत होती. म्हणाली, “सदोष मनुष्यवधाचा गुन्हा. आता आजन्म कारावास. जेल. माझा फैसला मीच केला. काळजी करू नकोस शाम. जेलमधे मला सुरक्षितपणे जगता येईल. माझ्या स्त्रीत्वासकट...!! माझ्यासारख्या काही मीरांना ह्या लांडग्यापासून मी वाचवलं ह्याचं समाधान वाटतंय मला.”

आणि डोळ्यातून पाण्याचा टिपूसही न काढता ताठ मानेने ती पोलिसकस्टडीच्या दिशेने निघाली....

----------------------------------------

**लीना माटे**

**Email - leenashining@gmail.com**